# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 29/11/2022 (मंगळवार) सायंकाळ

---

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पो.स्टे. मौदा:— अंतर्गत १२ कि. मी. अंतरावरील मशान भूमी जवळ भुगाव शिवार मौदा येथे दिनांक २९/११/२०२२ ०२.१० वा. ते ०३.०० वा. दरम्यान मौदा पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौदा पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन पिकअप क्र. एम. एच—४०/टि.सी—०८७ चे क्रमांकाच्या वाहनाला थांबवुन तपासले असता सदर वाहन पिकअप एम.एच ४० टि.सी ०८७ चे डाल्या मध्ये ५ पांढऱ्या रंगाचे बैल गोवंशीय जनावरे त्यांचे तोंड, पाय दोरीने बांधुन त्यांना क्लेशपणे वागणुक देवुन कोणत्याही प्रकारची जनावरांची चारापाण्याची व्यवस्था न करता त्यांना कोंबुन कत्तलीकरीता अवैधरीत्या घेवुन जातांना मिळुन आल्याने त्यात एकुण ०५ बैल गोवंशीय जनावरे प्रत्येकी जनावरे किमती २०,००० रू प्रमाणे किंमती अंदाजे १,००,०००/— रू. व बोलेरो पिकअप एम. एच ४०/टि. सी—०८७ किंमती अंदाजे ५,००,०००/— रूपयाचा असा एकुण ६,००,००० रूपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने सदर वाहन चालक मालक यांचे विरूदध सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे पोलीस नाईक संजय बरोदीया, वय ३१ वर्ष, ब. नं २१५६ पोलीस स्टेशन मौदा यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११(१)(ड) प्रा. छ. प्र. अधि. ५(अ), ९ म. प्रा. संर. अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक संजय बरोदीया ब. नं २१५६ मो. क्र. ९५२७७९६८२४ पोलीस स्अेशन मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर